# ...अन् विश्वासने कानाने यश अनुभवले

## बहिरेपणा आलेल्या रत्नागिरीतील विश्वास शिंदेची कथा ; फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनची मदत

प्रतिनिधी
मुंबई

नववीत शिकत असताना विश्वास शिंदे याला गालगुंडाचा तीव्र संसर्ग झाल्याने त्याला बहिरेपणा आला. घरातील गरीब स्थिती आणि शिकण्याची जिद्द यावर मात करण्याचा यक्ष प्रश्न शिंदे कुटुंबियांसमोर उभा राहिला होता. मात्र, मुकुल माधव फाऊंडेशन आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कित्येक मदतगारांच्या साहाय्याने विश्वासला यशाचे सूर ऐकू येऊ लागले.

विश्वास सर्वसामान्य आरोग्य स्थितीत होता. नववीत त्याला गालगुंडाचा त्रास झाल्याने श्रवणशक्तीच गमावून बसला. मात्र, शिकत असलेल्या विश्वासचे पुढे काय करायचे, असा प्रश्न उभा राहिल्याचे विश्वासचा भाऊ अरुण यांनी सांगितले. चांदराई, रत्नागिरी येथील शिंदे कुटुंबातील हा सामान्य विद्यार्थी आहे. विश्वासला दुर्दैवाने मम्प्स अटॅकचा सामना करावा लागला. त्यामुळे त्याला कायमचे बहिरेपण आले. त्याने विशेष श्रेणी अंतर्गत शालांत परीक्षेत ८० टक्के गुण मिळवले. तर रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनियरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. त्याचे प्राध्यापक बेळवालकर यांनी त्याची समस्या ओळखून मोफत उपचारांसाठी अनेक डॉक्टर आणि संस्थांची नावे सुचवली. मात्र, त्याला कॉक्लिअर इम्प्लांट उपचार आवश्यक असल्याचे निदान करण्यात आले. विश्वासला मुंबईतील डॉ. एम. व्ही. हिंदुजा हॉस्पिटल येथील



डॉ. किर्तने यांच्याकडे पाठवण्यात आले. डॉ. कीर्तने यांच्या टीममधील डॉ. क्षमा कोवाळे यांनी मदत केली. त्यांनी कॉक्लिअर प्रत्यारोपण करण्यापूर्वी काही चाचण्या करण्यास विश्वासला सांगितले.

- ▶ शस्त्रक्रियेसाठी देणगीदार पुढे
- ▶ साडेपाच लाखाची त्वरित मदत
- ▶ बीई करण्यासाठी दरवर्षी २० हजार
- ▶ जिद्दीच्या जोरावर अडचणींवर मात

या शस्त्रक्रियेच्या खर्चासाठी अनेक देणगीदार पुढे आले. यातील मुख्य खर्चाचा भाग हा कॉक्लिअर यंत्राचा होता. येथेच डॉ. किर्तने यांनी मुकुल माधव फाऊंडेशनला मदतीसाठी बोलावले. या संस्थेने ५.५ लाख रुपयांची त्वरीत मदत केली. शिवाय फाऊंडेशनच्यावतीने विश्वासला मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बी. ई. करण्यासाठी तीन वर्षे दरवर्षी २० हजार रुपये दिले. याबाबत बोलताना फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया यांनी सांगितले की, फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रमांना नेहमी प्रोत्साहन देते. स्वत:च्या मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर विश्वासने सर्व कठीण आव्हानांवर मात करत अभियंता बनण्याचे स्वप्न साकार केले आहे.मला नवे जीवन मिळवून दिल्याबद्दल मदत करणाऱ्यांचे आभार मानतो. यामुळेच मला यश ऐकू येऊ लागले. ऐकण्याची शक्ती गेल्यामुळे माझे जग आरपार बदलून गेले आणि नैराश्याची भावना आली. आज यशाची भावना आली असल्याचे विश्वास म्हणाला.